## सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,शिंदखेडा

### मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, शिंदखेडा,ता.शिंदखेडा जि.धुळे

जा.क्र.वि-२/हातनुर/कलम७७ अ/सुध.आदेश/१७ — दिनांक ३०/११/१७

वाचावे:-१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (सुधारणा २०१३) चे कलम ७७-अ(१-अ)(ब)
२.महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४
३.या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.वि-२/हातनुर/कलम७७ अ/सन२०१७ दिनांक ८/११/२०१७
४.श्री.भाऊसाहेब महाले,बॅक तपासणीस, शाखा शिंदखेडा, विभाग शिंदखेडा, अधिन धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती बॅक मर्या.धुळे यांचेकडील पत्र दि.२९/११/२०१७

---

ज्याअर्थी, वाचावे क्र.३ दिनांक ३०/११/२०१७ नुसार हातनुर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.हातनुर ता.शिंदखेडा जि.धुळे या संस्थेचे संचालक मंडळ निष्प्रभावित करून संस्थेवर श्री.भाऊसाहेब महाले, बॅक तपासणीस, शाखा शिंदखेडा, विभाग शिंदखेडा, अधिन धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती बॅक मर्या.धुळे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली आहे.आणि,

ज्याअर्थी, वाचावे क्र.४, प्रशासक, श्री.भाऊसाहेब महाले, हातनुर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.हातनुर ता.शिंदखेडा जि.धुळे यांचेकडील दिनांक २९/११/२०१७ रोजीचे पत्रानुसार श्री.महाले हे हातनुर गावाचे असल्यामुळे त्याच गावातील संस्थेवर कामकाज करणे अडचणीचे होत आहे.

त्याअर्थी, प्रशासकांचे कामकाजात अडचणी येवू नये व कामकाजात सुसुत्रता रहावी यासाठी हातनुर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. हातनुर ता.शिंदखेडा जि.धुळे या संस्थेवर नियुक्ती केलेले प्राधिकृत अधिकारी श्री.भाऊसाहेब महाले यांचे नेमणुक रद्द करून नवीन प्रशासकांची नेमणुक करणे आवश्यक झालेले असल्याची माझी खात्री झाल्याने खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करणे क्रमप्राप्त झालेले आहे,

### सुधारीत आदेश

मी, प्रदीप बागुल, सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,शिंदखेडा, मला, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ नुसार प्राप्त झालेल्या विधीशक्तीनुसार हातनुर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.हातनुर ता.शिंदखेडा जि.धुळे या संस्थेवर नियुक्त कलेले श्री.भाऊसाहेब महाले, बॅक तपासणीस, शाखा शिंदखेडा याचे ऐवजी श्री.पी.एस.थोरात, बॅक तपासणीस, शाखा शिंदखेडा यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणुक करीत आहे.

सदरचा आदेश आज रोजी दिनांक ३०/११/२०१७ रोजी माझ्या सही शिक्यानिशी पारीत करीत आहे.

(प्रदीप बागुल)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,शिंदखेडा, जि.धु

प्रत:-

१.श्री.भाऊसाहेब महाले, बॅक तपासणीस, शिंदखेडा शाखा,धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी
मर्या.धुळे

२/- यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्याचेकडे असलेला हातनुर विविध कार्यकारी सहक
संस्थेचा पदभार श्री.पी.एस.थोरात बॅक तपासणीस शिंदखेडा शाखा याचेकडे हस्तांतरीत करावा व
केल्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२.श्री.पी.एस.थोरात, बॅक तपासणीस, शिंदखेडा शाखा, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी
मर्या.धुळे

२/- आपणांस सुचित करण्यात येते की, आपण श्री.महाले यांचेकडून उक्त संस्थेच्या प्रशासक पद
पदभार घेवून, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था (समि
निवडणुक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार कामकाज करून वेळोवेळी अहवाल या कार्यालयास स
करावा.

२. चेअरमन/सचिव, हातनुर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.हातनुर ता.शिंदखेडा जि.धुळे

२/- यांना सुचित करण्यात येते की, आपण उक्त आदेशाची अंमलबजावणी करावी.

प्रत माहीतीस्तव-

१.मुख्य कार्यकारी सहकारी,धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक मर्या.धुळे

२.विभागीय अधिकारी,भाग शिंदखेडा, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक मर्या.धुळे

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,शिंदखेडा जि.ध